**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१४८/२०२३**
**निशाणी क्र. ६६**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ४ यांची जबानी</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की --

माझे नांव - वैभव बाळासाहेब पवार
वय सुमारे - ३६ वर्षे, व्यवसाय - नायब तहसिलदार,
नेमणुक – उपविभागीय अधिकारी कार्यालय, वाई.
---------------------

**<u>वादीतर्फे सरतपास ॲड. श्री. ए. के. शिंदे यांचेतर्फे सुरू</u> :**

१. मी आजरोजी कागद यादीसोबत जिल्हाधिकारी कार्यालयातील संचिका दाखल केली आहे. सदर संचिकेची १ ते ३० पाने आहेत. सदर संचिका ही मौजे मोळेश्वर, ता.महाबळेश्वर येथील सर्वे नं.८ मधील शेतघर बांधकाम परवानगी गॉडन एलिस गोन्सालवीस याबाबत आहे. त्यांचा अर्ज संचिकेतील पान क्रं.५ व ६ वर आहे. मंजुर टिपणी ही पान क्रं.७ व ८ वर आहे. त्यावर फार्महाऊस बांधणेकरीता परवानगी दिल्याचा आदेश आहे. सदर टिपणीमध्ये मालकी व कब्जाबाबत नकारार्थी बाबी नाहीत. पान क्रं.९ वर सहहिस्सेदाराचे संमत्तीपत्र आहे. पान क्रं.११ वर वादीने दि.०९.१२.१९८८ रोजी दिलेला अर्ज आहे. सहहिस्सेदाराची संमत्ती पुन्हा पान क्रं.१३ वर आहे. वस्तुस्थितीचा पंचनामा पान क्रं.१५ वर आहे. त्यावर पंच व निवासी नायब तहसिलदार, महाबळेश्वर यांची सही आहे. पान क्रं.१७ वर तलाठी मोळेश्वर यांनी दि.१२.१२.१९८८ रोजी दिलेला अहवाल आहे. सदर अहवालामध्ये पीक पाहणीची नोंद आहे. पान क्रं.१९ ते २३ ला दावा मिळकतीचे ७/१२ उतारे आहेत. पान क्रं.२३ वर सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडुन जिल्हाधिकारी यांनी मागविलेला अहवाल आहे. सदरचा अहवाल बांधकाम आराखडयासह आहे. पान क्रं.२७ वर कार्यकारी अभियंता, सामाजिक बांधकाम, पश्चिम विभाग, सातारा यांचा अहवाल आहे. तसेच पान क्रं.२९ वर शेतघर बांधण्याकरीता दिलेल्या परवानगीचा आदेश आहे. मी दाखल केलेली सर्व कागदपत्रे ही जिल्हाधिकारी, सातारा यांचे

कार्यालयातील मुळ संचिकेप्रमाणे आहेत. मी आजरोजी मुळ संचिका सोबत आणलेली आहे. मुळ संचिकेप्रमाणे एक प्रत व्हेरीफाय करुन न्यायालयात दाखल केलेली आहे. सदर संचिकेच्या प्रमाणित प्रतीस **नि.क्रं.६७** देणेत येत आहे.

**उलटतपास प्रतिवादींतर्फे सरकारी वकील श्री. ए. आर. कुलकर्णी यांचेतर्फे** :

२. मी महसुल खात्यात सन २०१६ पासुन नायब तहसिलदार म्हणुन कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की आज दाखल केलेली कागदपत्रे ही मी रुजु होण्यापुर्वी पासुनची असुन त्याबाबत मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की त्याच्या सत्यतेबाबत मला वैयक्तीतक माहिती नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की सन २०१० मध्ये शासनाने देवस्थान जमीनीबाबत एक परिपत्रक काढले होते. हे म्हणणे खरे आहे की सदर परिपत्रकानुसार देवस्थान जमीनीचे जे व्यवहार झालेले आहेत ते पुनर्विलोकनाकरीता घेतले होते व त्यातलीच ही एक मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की पुनर्विलोकन केल्यानंतर देवस्थानचे नाव पुन्हा लावण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की आजरोजी सदर मिळकतीची मालकी देवस्थानची आहे. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळच्या उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन तथाकथीत परवानगी देण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की सदर परवानगी देताना मालकी हक्काबाबत काही वाद उपत्नन झाल्यास परवानगी रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवलेला असतो. हे म्हणणे खरे आहे की पुनर्विलोकन हे उपविभागीय अधिकारी वाई यांनी केले होते. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई
दिनांक : १२.१२.२०२५

(ए. ए. पाचरणे )
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
वाई.